**BDC LIBRARY**
**New Paper Clipping**
**A.Y. 2023-2024**

# नवीन शैक्षणिक धोरणात स्पष्टता हवी

## नाबार्डचे अध्यक्ष यशवंत थोरात : शाळा पातळीवर अंमलबजावणी महत्त्वाची

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

आजच्या युगात शिक्षण क्षेत्र अनेक बदलांमधून जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये फक्त चांगले शब्द आहेत. पण शाळेच्या पातळीवर त्यांची अंमलबजावणी कशी करायची याबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत. यामध्ये स्पष्टता येणे गरजेचे आहे, असे मत नाबार्डचे अध्यक्ष यशवंत थोरात यांनी व्यक्त केले.



पाटण : विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांसमोर बोलताना यशवंत थोरात. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर.

बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये नवीन शिक्षणपद्धती या विषयावर ते बोलत होते. या कार्यक्रमास श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संजीव चव्हाण हे उपस्थित होते. यशवंत थोरात म्हणाले, वास्तविक मुलांचा आपल्या कुटुंबाबाहेरील 'रोल मॉडेल हा शिक्षक असतो. म्हणून त्यांनी शिक्षकांनी त्यांचे कार्य पूर्ण कौशल्याने, परिश्रमपूर्वक आणि परिणामकारक करणे आवश्यक आहे. संपूर्ण जीवनाच्या वाटचालीत आपल्याला अनेक अडचणींना, संकटाना, समस्यांना, परिस्थितीला सामोरे जावं लागलेलं असत. त्यातून मार्ग काढत असताना आपले श्रम, बुद्धिमत्ता, माहिती आणि कल्पकता यांचा वापर करून त्यावर मात केली जाते त्याला यश म्हणतात. त्यामुळेच तुमच्या यशाची व्याख्या तुम्ही स्वत तयार करा. माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यासोबत ३ वर्षे काम करताना त्यांच्यापासून बरेच काही शिकायला मिळाल्याचेही डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी सांगितले.

यावेळी विविध शाखांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी आभार मानले.